




Title Code- MAHMAR-51647

# दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com



आकर्षक व दर्जेदार स्कीमसह

युसीएन सिटी डिजिटल सेट-टॉप बॉक्स आपल्या घरी..




संपर्क :- 9129582958

पत्ता - शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स बुलडाणा अर्बन मुख्यालय समोर बुलडाणा



वर्ष २ रे | अंक : ६८२. वा | मंगळवार | दि. १३ फेब्रुवारी २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये


## वरिष्ठांच्या आदेशाला केराची टोपली दाखवण्याची महसूलमध्ये परंपरा...

# विभागीय चौकशी सुरु असतांना ४२ ड येथील करोडो रुपयांचे शेकडो प्लॉटची नियमबाह्य व्यवहार...

**जनसंचलन/ बुलढाणा**

महसूल विभागात कार्यरत अनेक अधिकाऱ्यांना जणुकाही आपल्या वरिष्ठांच्या आदेशाला केराची टोपली दाखवण्याचा छंदच जडला आहे. विशेषतः भ्रष्ट अधिकाऱ्यांना वाचवण्याच्या प्रकारात तर हे प्रकार वारंवार घडताना दिसून येत आहेत. यापूर्वी जिल्हाधिकारी किरण पाटील यांनी अमरावती येथील महसूल उपायुक्त यांच्या आदेशाला अशीच केराची टोपली दाखवली होती, तर दुसरीकडे आता बुलढाणा उपविभागीय अधिकाऱ्यांनी तोच कित्ता गिरवल्याचे दिसून येत आहे. सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्या वतीने सातत्याने महसूल विभागात कार्यरत भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या विरोधात वृत्तमालिका प्रकाशित करणे तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नजरेस भ्रष्टाचार आणून देण्याचा प्रयत्न आजवर केलेला आहे. खरे तर एव्हढा पाठपुरावा अगदी पुरेसा आहे, एखाद्या भ्रष्ट अधिकाऱ्यावर कारवाई करण्यासंदर्भात. मात्र, बुलढाणा महसूल विभागात सर्रासपणे भ्रष्टाचाऱ्यांना अभय मिळताना दिसून येत आहे. भ्रष्ट अधिकाऱ्याला वाचवण्यासाठी महसूल विभागाचे वरिष्ठ अधिकारी वाट्टेल त्या थराला जात आहेत. भ्रष्टाचाऱ्यांना अभय देणे हा महसूल विभागात जणू धंदाच बनला आहे. जेंव्हा कनिष्ठ अधिकारी भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई करीत नाही, तेंव्हा नाईलाजाने वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे जावे लागते. जसेकि मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांच्यावर कारवाई करण्यासंदर्भात जेंव्हा टाळाटाळ करण्यात आली, तेंव्हा उपविभागीय अधिकाऱ्यांकडे तक्रार करण्यात आली. जेंव्हा ते तक्रार करीत नाही तेंव्हा निवासी उपजिल्हाधिकारी किंवा जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार झाली. तेही कारवाई करीत नसल्या कारणाने मग थेट अमरावती महसूल आयुक्तांकडे दाद मागण्यात आली. हे सर्व होत असले तरी दुसरीकडे मात्र महसूल विभागातील भ्रष्ट अधिकारी अगदी मजेत नोकरी आणि भ्रष्टाचार दोन्ही करीत आहेत. कोणीही त्यांच्यावर कारवाई करताना दिसून येत नाही. विशेष म्हणजे महसूल विभागाय याहून भयंकर प्रकार हा आहे की, भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई करण्यासंदर्भात वरिष्ठांकडून आदेश प्राप्त झाल्यानंतर देखील अधिकारी आपल्या खालच्या भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कारवाई करीत नाही. वरिष्ठांच्या आदेशाला देखील केराची टोपली दाखवण्याचे काम महसूल विभागात होत आहे. काही दिवसांपूर्वी तहसीलदार रूपेश खंडारे यांनी महाभ्रष्टाचारी मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांना साथ देत जमीन अकृषक करण्याचे एक नियमबाह्य काम केले होते. त्या प्रकरणी थेट महसूल आयुक्त कार्यालयातून जिल्हाधिकाऱ्यांना आदेश आले होते की, यासंदर्भात योग्य ती कारवाई करा. परंतु दोन-दोन आदेश प्राप्त होऊन देखील जिल्हाधिकारी किरण पाटील यांनी कोणतीही कारवाई केली नव्हती. त्यांनी महसूल उपायुक्तांच्या आदेशाला केराची टोपली दाखवली. यावरून महसूल विभागातील अधिकारी भ्रष्टाचारासमोर किती हतबल आणि लाचार झालेले आहेत हे दिसून येते.

**मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळेची विभागीय चौकशी सुरू असतांना तहसीलदार यांनी केला पदाचा गैरवापर तर बहुचर्चित मंडळ अधिकाऱ्याने सर्व नियमधाब्यावर बसवून काही वरिष्ठ अधिकाऱ्याना हाताशी धरून भ्रष्टाचारातून जमा केली करोडो रुपयांची संपत्ती / अपसंपदा या प्रकरणातील सर्व पुरावे देऊनही कारवाईत सुरू आहे फक्त एकमेकांना स्मरणपत्रांचा खेळ नाही दिसून येत महसूल प्रशासनात कोणताच मेळ**

जिल्हाधिकारी कार्यालयातून तहसीलदार रुपेश खंडारे यांच्यावर कारवाई करण्यासंदर्भात आदेश उपविभागीय अधिकाऱ्यांना प्राप्त झालेले आहेत. मात्र, एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी उलटून देखील यासंदर्भात उपविभागीय अधिकाऱ्यांनी कोणतीही कारवाई केली नाही. यावरून स्पष्ट आहे की, उपविभागीय अधिकाऱ्यांनी आपल्याच वरिष्ठांच्या आदेशाला केराची टोपली दाखवली. रूपेश खंडारे असोत की महाभ्रष्टाचारी मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे. यांच्यासारख्या भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई का होत नाही, हे कोडं अजूनही कोणाला उलगडलेलं नाही. आज महसूल विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचारासमोर अक्षरशः नांगी टाकल्यासारखे दिसून येत आहे. जिल्हाधिकारी असो की आणखी कोणीही अधिकारी आज भ्रष्टाचाऱ्यांसमोर त्यांनी पूर्ण शरणागती पत्करल्याचे दिसत आहे. हीच स्थिती राहिल्यास भविष्यात भ्रष्टाचाराची ही वाळवी संपूर्ण महसूल विभागाला पोखरून त्याला कोसळवण्यास कारणीभूत ठरणार हे नक्की. या स्थितीतही दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज मात्र जनतेचा जागता प्रहरी या नात्याने भ्रष्टाचाऱावर आणि भ्रष्टाचाऱ्यांवर आसूड ओढल्याशिवाय राहणार नाही.




**आयुक्तांचे जिल्हाधिकाऱ्यांना जिल्हाधिकाऱ्यांचे महसूल अधिकारींना महसूल अधिकाऱ्याचे अप्पर जिल्हाधिकारी तर अप्पर जिल्हाधिकारींचे उप विभागीय अधिकारी यांना तीन ते चार स्मरणपत्रे कारवाईस नेहमी नवीन नवीनच फंटे**

अजून बरेच काही पुढील भागात...

# ४० हजारांची लाच घेताना अभियंत्यासह वायरमनला लाचलुचपत विभागाने केली अटक






**जनसंचलन/मलकापूर**

आरओ प्लांट औद्योगिक वीज मीटरमधून कृषी पंपाला वापरलेल्या विजेबाबत गुन्हा दाखल न करणे तसेच सरासरी देयक कमी करण्यासाठी लाच मागणाऱ्या वीज कंपनीच्या कनिष्ठ अभियंत्यासह वायरमनला अँटी करप्शन ब्यूरोच्या पथकाने सोमवारी दुपारी अटक केली. दोघांविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. मलकापूर तालुक्यातील एका गावातील आरओ प्लांट संचालकाने लाचलुचपत विभागाच्या कार्यालयात तक्रार केली. त्यामध्ये वीज वितरण कंपनीचे ग्रामीण भाग ३ मध्ये कार्यरत कनिष्ठ अभियंता आकाश सुरेश क्षीरसागर, वायरमन महादेव कटू पारधी या दोघांनी विजेच्या चोरीचा गुन्हा दाखल न करण्याबाबत व सरासरी देयक देण्यासाठी ४० हजार रुपये लाच मागत असल्याचे नमूद केले. त्याबाबतची पडताळणी २९ जानेवारी रोजी करण्यात आली. त्यात वायरमन महादेव कटू पारधी यांनी कनिष्ठ अभियंता आकाश सुरेश क्षीरसागर याच्यासाठी पूर्वी ६० हजार रुपये घेतल्याची स्पष्टोक्ती देऊन तडजोडीअंती २० हजार रुपये लाच मागितल्याचे स्पष्ट झाले. १२ फेब्रुवारी रोजी सापळा कारवाईत तक्रारदारावर संशय आल्याने लाच स्वीकारली नाही. मात्र, लाचेची मागणी करण्यात आल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे वीज वितरण कंपनीच्या कनिष्ठ अभियंत्यासह वायरमनला सोमवारी अटक करण्यात आली. लाचलुचपत विभागाच्या पथकाने मलकापूर पोलिसांत दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला. लाचलुचपत विभागाचे पोलिस निरीक्षक सचिन इंगळे, पोहेकों प्रवीण बैरागी, नापोका जगदीश पवार, गौरव खत्री आदींनी ही कारवाई केली.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# जी - स्पार्क चषक क्रिकेट स्पर्धेचे थाटात उद्घाटन...




**जनसंचलन /बुलडाणा**

भारत विद्यालय क्रिकेट अँकॅडमी, बुलडाणा च्या वतीने आयोजित जी - स्पार्क चषक क्रिकेट स्पर्धेचे आज भारत विद्यालयाच्या अध्यक्षा डॉ सीमा आगाशे व प्रबोधन विद्यालयाचे उप प्राचार्य श्री चीम सर यांचे हस्ते थाटात उद्घाटन झाले. या प्रसंगी श्री अरविंद पवार, श्री कुलकर्णी, श्री अरुण सौभागे, श्री संदेश पाटील, श्री संजय देवल, श्री सावरमल शर्मा उपस्थित होते. ज्या खेळाडूंनी भारत विद्यालय क्रिकेट अकादमी ला राज्य स्तरावर पोहचवण्यात मोठी भूमिका बजावली असते अश्या खेळाडूंच्या सन्मानार्थ त्यांच्या नावाच्या सुरुवातीच्या अक्षरा पासून ट्रॉफी ला नाव दिल्या जाते .ही पद्धती गेल्या सात वर्षांपासून सुरू आहे. या मुळे शाळा सोडून जाणाऱ्या खेळाडूंचा सन्मान राखल्या जातो, नवीन खेळाडूंना खेळायला एक स्पर्धा मिळते व चांगली कामगिरी करण्याची जिद्द निर्माण होते व आपल्या नावाने सुद्धा अशीच ट्रॉफी व्हावी अशी इच्छा निर्माण होते. या वर्षी गौरव कोठाळे, सुयश सरदार, सुमेध जाधव, पुष्कर देशपांडे, प्रथमेश शेळके, अवधूत कुलकर्णी, अनिकेत मापारी, रंजित रखडे, कौस्तुभ मेहुणकर या खेळाडूच्या सन्मानार्थ स्पर्धेचे नामकरण केले आहे. या प्रसंगी या सर्व खेळाडूंना कॅप ऑफ ऑनर प्रदान करण्यात आली. याच समारंभात गेल्या वर्षी विविध क्रिकेट संघातील उत्कृष्ट खेळाडू कुणाल पाटील, मिहिर माळी, तन्वी तायडे, प्रणिता उगले,ओम तायडे, समर्थ लोखंडे यांना देखील कॅप ऑफ ऑनर प्रदान करण्यात आली. प्रबोधन विद्यालयाचे उप प्राचार्य झाल्याबद्दल श्री.गजानन चिम सर यांचा, २१किमी. जालना मॅरेथॉन मध्ये प्रभावी कामगिरी केल्याबद्दल श्री अरुण सौभागे यांचा ,विद्यापीठ क्रिकेट मध्ये कलर कोट मिळाल्या बद्दल भारत क्रिकेट अकॅडमी चा खेळाडू अनुराग गवई याचा व तळमळतेने क्रिकेट प्रशिक्षण केल्याबद्दल श्री. सावरमल शर्मा यांचा शाल श्रीफळ देवून सत्कार करण्यात आला. उद्घाटन समारंभाचे संचलन व आभार प्रदर्शन श्री संजय देवल यांनी केले. भारत विद्यालय क्रिकेट अकादमी चां १९ वर्षाखालील मुलांचा संघ यावर्षी राज्य स्तरावर पोहोचला होता. भारत विद्यालयाने आतापर्यंत ३३ राज्यस्तरीय क्रिकेट संघ व ५२४ राज्य स्तरीय क्रिकेट खेळाडू दिले आहेत हे विशेष.

# खामगाव येथे महासंस्कृती महोत्सवाचे उद्घाटन

## दोन दिवस सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवाणी

**जनसंचलन/खामगाव**

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग आणि जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने खामगाव येथे दोन दिवसीय महासंस्कृती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाचे उद्घाटन सोमवार, दि. १२ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता होणार आहे. खामगाव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर परिषद मैदान येथे दि. १२ व १३ फेब्रुवारी रोजी दररोज सायंकाळी ५ वाजता विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी पालकमंत्री दिलीप वळसे पाटील, वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार, खासदार प्रतापराव जाधव, रक्षा खडसे, आमदार किरण सरनाईक, वसंत खंडेलवाल, धीरज लिंगाडे, डॉ. राजेंद्र शिंगणे, डॉ. संजय कुटे, संजय रायमुलकर, संजय गायकवाड, ॲड. आकाश फुंडकर, राजेश एकडे, श्वेता महाले, सांस्कृतिक कार्य विभागाच्या सचिव जयश्री भोज, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे, जिल्हा पोलिस अधीक्षक सुनिल कडासने, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक विभीषण चवरे आदी उपस्थित राहतील. खामगाव येथे सोमवार, दि. १२ फेब्रुवारी रोजी संगीत रजनी होणार असून यात गायक राहूल सक्सेना आणि संच मराठी आणि हिंदी गीतांचा कार्यक्रम सादर करतील. त्यानंतर मंगळवार, दि. १३ फेब्रुवारी रोजी राजा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारीत महानाट्य ङ्गनिश्चय पूर्तीचा महामेरूफ होणार आहे. तसेच शनिवार, दि. २४ फेब्रुवारी रोजी सकाळी साडेसहा वाजता स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्त मॅरेथॉन आणि सकाळी साडेनऊ वाजता रांगोळी स्पर्धा होणार आहे.



कार्यक्रमाच्या ठिकाणी बचतगटांच्या स्टॉल्सच्या माध्यमातून खाद्य संस्कृतीचे आयोजन करण्यात आले आहे. या सांस्कृतिक कार्यक्रमांचा लाभ नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले. महासंस्कृती महोत्सवासाठी नागरिकांच्या सोयीसाठी वाहन पार्कींग व्यवस्था करण्यात आली आहे. मान्यवरांसाठी वाहनाची पार्कींग व्यवस्था ही खामगाव नगर परिषदेजवळ असणार आहे. तसेच नागरीकांसाठी वाहनाची पार्कीग व्यवस्था ही खामगाव शहर पोलीस स्टेशनजवळ, पोलीस परेड मैदान येथे करण्यात आली आहे.

# बुलडाण्यात धनगर समाजाचा आरक्षण अंमलबजावणीसाठी एल्गार मोर्चा...



**जनसंचलन/बुलडाणा**

धनगर समाजाला मिळालेल्या आरक्षणाची संपूर्ण अंमलबजावणी करण्यात यावी या प्रमुख मागणीसाठी गेल्या पंधरा दिवसांपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर नंदू लवंगे यांनी सुरू केलेल्या उपोषणाची प्रशासनाने कोणतीही दखल घेतली नाही. त्यामुळे संतप्त झालेल्या सकल धनगर समाजाचा एल्गार मोर्चा आज सोमवार १२ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. यावेळी मोर्चेकऱ्यांनी नंदू लवंगे आगे बढो, हम तुम्हारे साथ है..आरक्षण आमच्या हक्काचे, नाही कुणाच्या बापाचे अशा घोषणा देत, परिसर दणाणून गेले होते, जिल्हाभरातून आलेले धनगर बांधव या मोर्चात सहभागी झाले होते. येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नियोजित स्मारकापासून सकाळी ११ वाजता मोर्चाला सुरूवात झाली त्यानंतर शहरातील तहसील चौक, भोंडे सरकार चौक, कारंजा चौक, बाजारलाईन, व जयस्तंभ चौक मार्गे मोर्चा जिजामाता क्रिडा संकुल मैदानावर पोहोचला. येथे मोर्चाचे रूपांतर सभेत झाले. सभेनंतर सकल धनगर समाज बांधवांनी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांना विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. यावेळी सचिन सपकाळ, विजय शेजोळ, रामभाऊ जुमडे, सागर चिंचोळकर आदी सकल धनगर समाज बांधव उपस्थित होते.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानात धनगर समाजाला एस.टी. प्रवर्गात आरक्षण दिलेले आहे. मात्र, त्यावर प्रशासनाकडून अंमलबजावणी केली जात नाही. हा आमच्यावर अन्याय आहे. सरकारने आमच्या आरक्षण अंमलबजावणी बाबत तात्काळ निर्णय न घेतल्यास आगामी लोकसभा, विधानसभासह इतरही निवडणुकांमधील मतदानावर बहिष्कार टाकण्याचा इशारा यावेळी धनगर समाज बांधवांनी आपल्या भाषणातून दिला.

# नांदुरा पोलिसांनी उतरविला बुलेट चालकाचा रुबाब

**जनसंचलन/ नांदुरा**




नंबरप्लेटवर रुबाब लिहिलेल्या बुलेटला जप्त करून त्यावर योग्य नंबर लिहून घेण्याची कारवाई ११ फेब्रुवारी रोजी सकाळी ठाणेदार विलास पाटील यांनी केली. नांदुरा पोलिस स्टेशनचे ठाणेदार विलास पाटील शिवाजी चौकात वाहतूक पोलिसांसोबत कर्तव्य बजावत होते. एका बुलेटच्या नंबरप्लेटवर नंबर न लिहिता रुबाब लिहिलेले त्यांच्या निर्दशनास आले. त्यांनी ती दुचाकी जप्त केली. जोपर्यंत दुचाकीला दिलेली नंबरप्लेट लावत नाही, तोपर्यंत दुचाकी पोलिस स्टेशनच्या बाहेर न नेण्याचे सांगितले. त्यानंतर लगेच दुचाकीचा शासकीय नंबरची त्यावर नोंद करण्यात आली. फॅन्सी नंबर प्लेट न वापरता शासकीय वाहन नियमांचे पालन करावे, असे नांदुरा पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# यंदाची शिवजयंती ढोल ताशांच्या गजरात...

## बुलढाण्यातील रुद्र ढोल ताशा पथकांची जय्यत तयारी सुरू...

जनसंचलन/बुलढाणा

यंदाची शिवजयंती धूमधडाक्यात साजरी करण्यासाठी शिवप्रेमी सज्ज झाले आहेत. शिवप्रेमी सामाजिक, सांस्कृतिक मंडळांकडून मिरवणुका काढून, सामाजिक उपक्रम राबवून, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून दरवर्षी छत्रपती शिवाजी महाराजांना मानवंदना दिली जाते.मिरवणुकांमध्ये शिवरायांचा थाट साकारण्यात ढोल ताशा पथकांची भूमिका महत्त्वाची असते. त्यामुळे यंदा शिवजयंती



जल्लोषात साजरी करण्यासाठी बुलढाण्यातील रुद्र ढोल ताशा पथकांनी जय्यत तयारी सुरू केली आहे.

# वाळूची अवैध वाहतूक करणारे टिप्पर जप्त

## नायब तहसीलदार डॉ आस्मा मुजावर यांची धाडसी कारवाई

जनसंचलन/मोताळा

अवैध रेती तस्कराचा कर्दनकाळ असलेल्या महसूल नायब तहसिलदार डॉ अस्मा मुजावर यांनी धाडसी कारवाई करीत तालुक्यातील अंढेरानजीक अवैध वाळू वाहतूक करताना एक टिप्पर पकडून दंडात्मक कारवाई साठी अंढेरा पोलीस ठाण्यात लावल्याने रेती माफिया मधे दहशद पसरली आहे तालुक्यात खडकपूर्णा नदी पात्रातून दररोज शेकडो ब्रास रेतीचे अवैध उत्खनन करून जिल्ह्यासह जिल्ह्याबाहेर वाहतूक करण्यात येते. नायब तहसीलदार डॉ आस्मा मुजावर या अवैध वाळू प्रतिबंधक पथकात गस्तीवर असताना त्यांना अंढेरा फाट्यानजीक एमएच-२८-एबी-९१९९ या क्रमांकाचे चिखलीच्या दिशेने जाताना दिसले त्यांनी पाठलाग. करून वाहन अडवून चौकशी केली असता त्यात चार ब्रास बेकायदा वाळू आढळली. टिप्परचालक हर्षल सांडू देवकर (भानखेड) यास विचारणा केली असता सदर टिप्पर सचिन देविदास चित्ते (निमगाव गुरु) यांच्या मालकीचे असल्याचे सांगितले.



सदर टिप्पर जप्त करून दंडात्मक कारवाई साठीअंढेरा पोलिसांत जमा केले आहे या धाडसी कारवाई मुळे रेती तस्करात दहशद पसरली आहे

# श्री छत्रपती शिवाजी महाराज क्रिडा व सांस्कृतिक प्रतिष्ठान च्या वतीने घेण्यात आलेल्या कबड्डी स्पर्धेचे बक्षीस वितरण...

## माही बहुउद्देशीय मंडळ मुर्तिजापुर प्रथम तर जय संतोषी माँ जानेफळ द्वितीय...

जनसंचनल/खामगाव

खामगाव हिंदवी स्वराज्य संस्थापक अखंड हिंदुस्थान चे प्रेरणा स्थान श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त श्री छत्रपती शिवाजी महाराज क्रिडा व सांस्कृतिक प्रतिष्ठान शिवाजी महाराज नगर च्या वतीने राज्यस्तरीय आमंत्रित भव्य दिव्य कबड्डी स्पर्धा चे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये दिं ९ फेब्रु ते ११ फेब्रु दरम्यान येथील शिवाजी महाराज स्टेडियम वर पार पडलेल्या आमंत्रित कबड्डी स्पर्धे चे बक्षीस वितरण ११ फेब्रुवारी च्या रात्री करण्यात आले या मध्ये मुर्तिजापुर येथील माही बहुउद्देशीय मंडळ अव्वल तर जानेफळ चे जय संतोषी माँ द्वितीय ठरले आहेत . अनुक्रमे ५१ , ३१व २१ हजाराचे रोख बक्षीस देवुन या संघाचा खासदार प्रतापराव जाधव यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. शिवजयंती महोत्सवानिमित्त विविध कार्यक्रम घेण्यात आले. त्यापैकी आमंत्रित कबड्डी स्पर्धेत अमरावती. धुळे. भुसावळ. तरहाळा. वाशिम. खामगाव, जळगाव,भोपाळ,अकोला, मुर्तिजापूर, नागपूर, पुणे, नगर, जानोरी, या जिल्ह्यातील व इतर ठिकाण च्या १९ संघांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. सतत ३ दिवस चाललेल्या स्पर्धेत सहभागी कबड्डी संघातील खेळाडूंनी आपले कसब दाखविले. अखेर चा सामना ११ फेब्रुवारी च्या रात्री झाला. या मध्ये माही बहुउद्देशीय मंडळ व जय संतोषी माँ या कबड्डी संघात खेळला गेला. या मध्ये माही बहुउद्देशीय मंडळ ने जय संतोषी माँ कबड्डी संघावर मात केली. त्यानंतर रात्री असंख्य नागरिकांच्या उपस्थित श्री शिवाजी महाराज स्टेडियम वर बक्षीस वितरण पार पडले. या प्रसंगी खासदार श्री प्रतापराव जाधव लोकसभा मतदारसंघ बुलढाणा ,श्री अशोक भाऊ सोनोने प्रदेशाध्यक्ष वंचित बहुजन आघाडी, श्री अजिंक्य बोबडे सेवा निवृत्त साहेब पोलीस आयुक्त, श्री संदिप शेळके अध्यक्ष वन मिशन, श्री प्रितमजी जाधव ठाणेदार शिवाजी नगर, श्री नरूभाऊ खेडेकर जिल्हा प्रमुख शिवसेना उ बा ठा गट, श्री सुभाष राव पेसोडे सभापती कृ ऊ बा समिती, श्री डॉ सदानंद इंगळे अध्यक्ष आय एम ए,श्री शरद भाऊ वसतकर प्रदेश उपाध्यक्ष वंचित बहुजन आघाडी, श्री राजेश जी राजोरे जेष्ठ पत्रकार , श्री अशोक बाप्पु देशमुख अध्यक्ष विदर्भ कबड्डी असो,श्री गणेश भाऊ




चौकसे जिल्हा अध्यक्ष वंचित बहुजन समाज,श्री गणेश भाऊ माने माजी नगराध्यक्ष तथा प्रतिष्ठान चे अध्यक्ष,श्री राम भाऊ बोन्दे अध्यक्ष हनुमान व्यायाम मंडळ,श्री संजय अवताडे,राष्ट्रीय खेळाडू नरेंद्र भाऊ मावळे. महेंद्र पाठक. रमाकांत गलांडे. सुभाष शेळके. विकास चव्हाण.डि आर गलांडे, चंद्र कांत रेठेकर , कल्याणभाऊ गलांडे, प्रसादभाऊ तोडकर, स.ए.मंडळाचे संस्थापक अध्यक्ष देविदास शर्मा, तानाजी घोगरे. शशिकांत वखरे. यांची उपस्थिती होती. यावेळी माही बहुउद्देशीय मंडळ यांना प्रथम क्रमांकाचे ५१ हजार. जय संतोषी माँ यांना द्वितीय ३१ हजार तर शिवनेरी स्पोटिंग क्लब सुटाळा व आर. सी.सी क्लब भोपाळ यांना तृतीय क्रमांकाचे २१ हजाराचे बक्षीस प्रत्येकी १० हजार ५०० विभागून देण्यात आले. तर मॅन ऑफ दी टुर्नामेंट कुलदीप कुमार माही स्पोटिंग मुर्तिजापूर, यांना प्रत्येकी ५ हजार रुपये तसेच मॅन ऑफ दी डे सुरज झाडे राजु शुभम पातुर्डा व सुरज कुमार शिवनेरी सुटाळा यांना प्रत्येकी २ हजार ५०० रुपयांचे बक्षीस देण्यात आले या प्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रतिष्ठान चे अध्यक्ष गणेश भाऊ माने यांनी केले, खासदार प्रतापराव जाधव, अशोकभाऊ सोनोने,जेष्ठ पत्रकार राजेश राजोरे. यांनी आपले मनोगत व्यक्त केले या वेळी प्रतिष्ठान चे अध्यक्ष गणेश माने.रमाकांत गलांडे. सुभाष शेळके. विकास चव्हाण, राम बोन्द्रे. नरेंद्र मावळे. डिगांबर गलांडे. महेंद्र पाठक.कल्याण गलांडे, चंद्रकांत रेठेकर,प्रसाद तोडकर, देविदास शर्मा.नागोराव अवतार, स्वप्नील शहा, अरूण भोसले,नरेंद्र पुरोहित. संभाजी राऊत,आनंद पवार, लालाजी सांगळे,तानाजी राऊत, राज किशोर तिवारी,रवी आनंदे, सुनील मोटे, श्याम गलांडे,अनिल मापारी, सुर्यकांत मुंडिवाले,गणेश मानेकर,मुन्ना बोन्द्रे, भगवान निंबाळकर.शैलेश सोले. गजानन मुळीक. सागर मोरे. शुभम मुळीक. गुड्डु गांडाळ.आकाश दळवी. निखिल मोरे. आकाश शिंदे.सुदाम पाडोळे, निखिल घाडगे. सुरज साबळे, बंडु घाडगे. साहेबराव वाशिमकर, अभय जोध, दिनेश उखळकर,बंटी बोन्दे,विक्रांत माने, या स्पर्धेचे पंच म्हणून गजानन राऊत स्पर्धा निरिक्षक, दिनेश चंदेल पंच , विपिन हटकर, अशोक ढिसले,सोनकर सर, चरणसिंग राजपूत राजेश तोडेकर,चरण सिरसाट, वसंता उटाळे, परमेश्वर बोरसे,यांनी काम पाहिले. प्रथोमपचार डॉ देशमुख. डॉ छाजेड. सप्नील शाह ,दशरथ बोहरा. आदींचे सहकार्य लाभले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसादभाऊ तोडकर व आभार प्रदर्शन रमाकांत जी गलांडे, यांनी केले अशी माहिती श्री छत्रपती शिवाजी महाराज क्रिडा व सांस्कृतिक प्रतिष्ठान चे प्रसिद्धी प्रमुख देविदास ऊर्फ मुन्ना शर्मा यांनी दिली

# अजितदादा आणि अशोक चव्हाण यांची गुप्त बैठक, तिथेच सगळं ठरलं?

## विकास लवांडे यांचे सनसनाटी दावे...

**वृत्तसंस्था/मुंबई**

राज्यसभा निवडणुकीच्या तोंडावर अशोक चव्हाण यांनी आज काँग्रेसच्या प्राथमिक सदस्यत्वाचा आणि आपल्या आमदारकीचा राजीनामा दिल्याने राजकीय वर्तुळात भूकंप झालाय. भाजपमध्ये प्रवेश करणार नाही, असे त्यांनी थेटपणे सांगितले नसले तरी त्यांनी तसे उघड उघड संकेत दिले आहेत. राजीनाम्याची गोष्ट कधीपासून तुमच्या डोक्यात सुरू होती, असा प्रश्न ज्यावेळी पत्रकारांनी विचारला त्यावेळी सगळ्याच गोष्टी सांगायच्या नसतात, असं म्हणून त्यांनी यावर अधिकचं बोलणं टाळलं. परंतु शरद पवार गटाचे नेते विकास लवांडे यांनी अशोक चव्हाण यांच्याविषयी धक्कादायक गौप्यस्फोट केले आहेत. राजीनाम्याची बिजं कधीपासून पेरली गेली, हेच सांगण्याचा त्यांनी प्रयत्न केला.आज माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अशोक चव्हाण यांनी पक्षाचा व विधानसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिला. याबाबत त्यांची अजित पवार यांच्या सोबत दि. २७ की २८ जून २०२३ रोजी मुंबईत देवगिरी या शासकीय बंगल्यावर गुप्त बैठक झाली होती. देवगिरीवर त्याच दिवशी अजितदादांनी मला बोलावून घेतले होते. दादांची माझी राजकीय सद्यस्थिती बाबत चर्चा चालू असताना अशोक चव्हाण तिथे आल्यावर मग दादांनी मला आपण नंतर चर्चा करू असे सांगितले व मी तिथून बाहेर पडलो.त्यानंतर त्यांची दोघांची बराच वेळ बंद दाराआड चर्चा झाली होती. अजितदादा आणि अशोक चव्हाण यांचा निर्णय तेव्हाच झालेला होता. त्यानंतर लगेच दि. २ जुलै २०२३ रोजी अजितदादा मित्र मंडळ राज्य सरकार मध्ये सामील झाले. आता अशोक चव्हाण काँग्रेस मधून बाहेर पडले हे पूर्वनियोजित होते. मला त्यात धक्कादायक काहीच वाटत नाही.ते भाजपा किंवा कदाचित अजितदादा गटात सुध्दा जातील कारण अजितदादा मित्र मंडळ आणि अशोक चव्हाण हे ईडी ग्रस्त असल्याने समदुःखी आहेत. जेल मध्ये जाण्यापेक्षा भाजपा सोबत गेलेले बरे .असे





सद्या देशभर वातावरण आहे. साम दाम दंड भेद या भाजपच्या राजनीतीचे देशाला दररोज दर्शन होत आहे. सत्तेचा दुरुपयोग कसा करायचा हे भाजपाने जगाला दाखवून दिले आहे. आपली संसदीय लोकशाही आणि भारतीय संविधान धोक्यात आहे हे नक्की

## उन्हाळी मशागतीसाठी ट्रॅक्टरला पसंती



**जनसंचलन/बुलढाणा**

ग्रामीण भागात खरीप हंगाम संपत आल्याने उन्हाळी मशागतीला सुरुवात झाली असून, शेतकरी मशागतीची कामे बैलजोडीपेक्षा ट्रॅक्टरला प्राधान्य देत असल्याचे दिसून येत आहे. चालू वर्षांत खरीप हंगामातील सर्वच पिकांची उलंगवाडी झाली असल्याने पहाटी पाडण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. यामध्ये चिमट्याच्या सहाय्याने पहाटी उपटणे सुरू आहे. एकरी हजार ते बाराशे रुपये एकराप्रमाणे मजुरी दिली जात आहे, तर काही शेतकऱ्यांनी ट्रॅक्टरला पसंती दिली आहे. एकेकाळी बैलजोडीने पहाटी पाडण्याचे काम मोठ्या प्रमाणावर केल्या जात होते, परंतु आज रोजी बैलजोडी नावापुरतीच राहिली आहे. खरीप हंगामातील पेरणीपासून ते दिवाळीपर्यंत बैलजोडीची आवश्यकता असते, इतर कामे यंत्रांनी करतात.

बुलडाणा शहर व परिसरातील रुग्णांच्या सेवेसाठी अत्याधुनिक सेवा सुविधांनी सुसज्ज असे
डॉ. ऋषिकेश अशोक निकम यांचे ....
निकम ॲक्सीडेंट व ट्रॉमा सेंटर
पत्ता: डॉ. व्यवहारे हॉस्पिटल(पहिला मजला), जांभरुण रोड, बुलडाणा
मो. 9923191666
* उपलब्ध सुविधा *
- कृत्रिम सांधे प्रत्यारोपण
- अति जोखीमीचे हाडांची शस्त्रक्रिया
- लहान बाळांचे जन्मजात वाकडे पायावर उपचार (क्लबफूट)
- संधीवातावर उपचार
- गुडघ्याची दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया
- फ्रॅक्चरवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे उपचार व शस्त्रक्रिया
- मणक्यातील आजारावर उपचार
- दुर्बिणीद्वारे सांध्याची तपासणी व शस्त्रक्रिया
- कंबरेचे व मानेचे दुखणे
- पायातुन व हातातून तीव्र वेदना, मुंग्या येणे, बधू होणे यावर उपचार
डॉ. ऋषिकेश अशोक निकम
M.B.B.S, D-ORTHO (Mumbai)

## वन बुलडाणा मिशनच्या परिवर्तन रथयात्रेचा तिसरा दिवस! गावोगावी मिळतोय भक्कम प्रतिसाद...

### संदीप शेळके म्हणाले, परिवर्तन होणार, ही काळ्या दगडावरची रेख! रात्री मोताळ्यात मुक्काम.!

**जनसंचलन/बुलडाणा**

१० फेब्रुवारीपासून मोताळा तालुक्यातील नळकुंड गावातून सुरू झालेल्या वन बुलडाणा मिशनच्या परिवर्तन रथयात्रेचा आज, १२ फेब्रुवारीला तिसरा दिवस आहे. प्रत्येक गावखेड्यात या रथयात्रेला जोरदार प्रतिसाद मिळत असून गावागावात वन बुलडाणा मिशन संदीप शेळके यांचे दिमाखात स्वागत होत आहे. जनतेने आता जिल्ह्याच्या मगासलेपणाचा कलंक पुसण्याचा निर्धार केला आहे, त्यासाठी परिवर्तन आवश्यक आहे. त्यामुळे जिल्ह्यात आता परिवर्तन होणार ही काळ्या दगडावरची रेख असल्याचा विश्वास




संदीप शेळके यांनी व्यक्त केलाय. परिवर्तन रथयात्रा आज तिसऱ्या दिवशी लिहा, आव्हा, निपाना, माळेगाव, सावरगाव, शेलगाव बाजार, जहागीरपूर, माकोडी, टेंभी, पिंप्री गवळी, दाभाडी, घुस्सर, शेलापूर, तळणी, पिंपळवाटी, तालखेड, डीडोळा, चिंचपूर, रिधोरा मार्गे मुक्कामी मोताळ्यात पोहचणार आहे.

## बॅलेट पेपरद्वारे निवडणूक घ्या!...

**जनसंचलन/मलकापूर**

येथील बार असोसिएशन, सामाजिक, राजकीय पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी इव्हीएम मशिनला विरोध नोंदविला आहे. निवडणुका बॅलेट पेपरद्वारे घेण्याची मागणी वरिष्ठ विधिज्ञ ॲड. साहेबराव मोरे यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देऊन १२ फेब्रुवारी रोजी करण्यात आली. निवडणूक आयोगाला पाठविण्यात आलेल्या निवेदनात नमूद केले की, सत्तेचा दुरुपयोग करून जातीजातींमध्ये द्वेष पसरविण्याचे काम सुरू आहे. त्याचा फायदा निवडणुकीत व्हावा, यासाठी काही लोक काम करीत आहेत. महाराष्ट्रातील सत्ताधारी लोकच गंगवार करताना दिसत आहेत. सरकारची भूमिका संदिग्ध आहे. या गोष्टींच्या मुळाशी असलेल्या लोकांना सत्तेमध्ये आणण्याच काम इव्हीएम मशिनद्वारे केले जात आहे. त्यामुळे बॅलेट पेपरद्वारे निवडणूक घेण्याची मागणी करण्यात आली. निवेदनावर ॲड. साहेबराव मोरे, ॲड. जी.डब्लू सोमण, ॲड. एम.सी.रावळ, हाजी रशिदखाँ जमादार, ॲड. दिलीप बगाडे, ॲड, स्नेहल तायडे, ॲड. मजीद कुरेशी आदींची स्वाक्षरी आहे.

